जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०९/०७/२०२४
## दि.०८/०७/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ८२४ /२०२४, भा.न्या.सं.कलम ३०९(६),३(५) |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय ३९ वर्षे रा.हांडेवाडी पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील चार अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०७/२०२४ रोजी २३/०० वा. इनामदार नगर लेन नं २ शक्ती मॅट्रेटेसेस गादी कारखाना हांडेवाडी हडपसर पुणे. |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे वर नमुद ठिकाणाहुन जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांना मारहाण करुन त्यांना गंभीर जखमी करुन त्यांचेकडील ९,०००/- रुपये रोख जबरदस्तीने काढुन घेवुन गेले. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एस.डी.जाधव, मो नं ९९२१४९८०८६ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोरेगाव पार्क पो स्टे १२२/२०२४,भादविक भा.न्या.सं.कलम ३१८(४),३(५) |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय ५६ वर्षे रा.आंबेगाव पुणे |
| **आरोपीत** | अनोळखी तीन महिला व दोन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८/०७/२०२४ रोजी १८/४५ वा.सुमा. सेंट मिरा कॉलेजच्या बाजुला साधु वासवानी पुलाजवळ कोरेगाव पार्क पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे वर नमुद ठिकाणाहुन जात असताना,नमुद इसमांनी त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचेकडील सोन्याची चेन बघण्याचे बहाण्याने स्वतःकडे घेवुन त्यांनी त्यांचेकडील बनावट पिवळया धातुची ०२ चेन व ०१ अंगठी असे फिर्यादी यांना देवुन त्यांची ८०,०००/- रु.किं.ची.फसवणुक केली. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. काळ्ळुरे मो.नं ९८७०३२७७०० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ८२०/२०२४,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(ड) |
| **फिर्यादी** | एक इसम ,वय ५८ वर्षे रा.एन.आय.बी.एम रोड कोंढवा पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/०५/२०२४ ते आजपावेतो ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना नमुद अज्ञात मोबाईल धारक यांना शेअर्स ट्रेडींगमध्ये नफ्याबाबत प्रलोभन दाखवुन काही प्रमाणात नफा दर्शवुन फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन काहीएक परतावा न देतो फिर्यादी यांची ३९,८०,९७०/- रु.ची.आर्थिक फसवणुक केली . |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.बालाजी डिगोळे मो.नं ८१०८४३१११५ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे १९८/२०२४,भा.न्या.सं.कलम,१०५,१२५(ब),२८१,३२४(४),मोव्हेॲक्ट १८४,१३४ (अ)(ब),११९/१७७ |
| **फिर्यादी** | आनंद रुईकर,सहा पोलीस निरीक्षक,खडकी पोलीस स्टेशन,पुणे शहर. |
| **आरोपीत** | अज्ञात वाहन चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८/०७/२०२४ रोजी रात्रौ ०१/४० वा.चे सुमा.आंबेडकर चौकाकडे जाणा-या वाहीनीवर, अंडर पाससमोर, बोपोडी, पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील कार ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, जाणीवपुर्वक व भरधाव वेगाने चालवुन त्याच्या या कृतीमुळे मृत्यु व गंभीर दुखापत होऊ शकते हे माहीत असताना देखील त्याचे ताब्यातील वाहन अतिवेगाने हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन, नमुद ठिकाणी पोलीस अंमलदार समाधान आनंदराव कोळी, वय ४४ वर्षे व पोलीस अंमलदार संजोग श्याम शिंदे, वय ३५ वर्षे,हे पोलीस ठाणे हद्दीत बीट मार्शल पेट्रोलिंग करीत असताना,नमुद इसम याने समाधान कोळी यास पाठीमागुन जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्यांचे मृत्युस कारणीभुत होवुन संजोग शिंदे यांना गंभीर जखमी करुन अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.चोरमले, मो.नं. ९५९४५५३९९९ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ८२१/२०२४,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय ३६ वर्षे रा.कोंढवा पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक व टेलीग्राम लिंक धारक वापरकर्ते (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि २०/०६/२०२४ ते २४/०६/२०२४ रोजी दरम्यान ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना नमुद मोबाईल धारक व टेलीग्राम लिंक धारक वापरकर्ते यांनी टास्क पुर्ण केल्यास चांगला नफा मिळेल असे अमिष दाखवुन सुरवातीस थोडया प्रमाणात नफा देवुन त्यांचा विश्वास संपादन करून फिर्यादीची १२,४५,८९२/- रु.किं.ची.आर्थिक फसवणुक केली. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.बालाजी डिगोळे मो.नं ८१०८४३१११५ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे ३७०/२०२४, भा.न्या.सं कलम ३०८(२),३०८(५),आर्म ॲक्ट कलम ४(२५) |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय ३२ वर्षे रा.वडगांवशेरी पुणे |
| **आरोपीत** | एक विधिसंघर्षीत (ताब्यात) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/०७/२०२४ रोजी दु.१२/०० वा.सुमा.होलसेल ॲण्ड ट्रेडर्स,साईनाथनगर चौक वडगांवशेरी पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे वर नमुद ठिकाणी किराणा मालाचे दुकान असुन,नमुद इसम याने सदर ठिकाणी येवुन फिर्यादी यांना येथे धंदा करावयाचा असल्यास हप्ता द्यावा लागेल असे म्हणाला असता, फिर्यादी यांनी त्यास नकार दिलेने त्याने त्याचेजवळ असलेले धारदार हत्याराचा धाक दाखवुन फिर्यादी यांचेकडील २००/- रु.ची व इतर व्यापारी यांचेकडुन खंडणी स्वरुपात काही रक्कम घेतली . |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.सिद्धनाथ खांडेकर, मो.नं ९५२९७९६००६ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**